तात्काळ/कालमर्यादा/महत्त्वाचे

क्रमांक -पोमसं/३१/३९-३/मोवाअ-संगणक अग्रीम (२०२३-२४)/९७/२०२३ मुंबई, दि. १८ /०८/२०२३

विषय :- लेखा अनुदान २०२३ - २४
मागणी क्र.बी-११, मुख्यलेखाशिर्ष- "७६१०- शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे" गौणशिर्ष-२०२, मोटार वाहन अग्रिमाबाबत.

*********

## आदेश

शासन निर्णय ,गृह विभाग क्र.बीयुडी- ०४२३/प्र.क्र.१२२/आस्था-१, दि.०२/०५/२०२३ अन्वये सन २०२३-२४ या वित्तिय वर्षासाठी पोलीस दलातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना मोटार-वाहन अग्रिमाचे वाटप करण्याकरिता रु.२०,००,०००/-(अक्षरी वीस लाख फक्त) एवढा निधी शासनाने मागणी क्र.बी - ११ मुख्यलेखाशिर्ष " ७६१०- शासकीय कर्मचारी इ.कर्जे " मधील गौणशिर्ष २०२- मोटार वाहन अग्रिम (सांकेतांक क्रमांक ७६१०१८५१) योजनेअतंर्गत चिन्हांकित करुन दिला आहे. या कार्यालयाच्या अधिपत्याखालील घटक कार्यालयांना त्यांच्या अधिनस्थ २९ अधिकारी/ कर्मचाऱ्यांना मोटार वाहन अग्रिमाकरीता एकूण रु.२०,००,०००/- (अक्षरी रु. वीस लाख फक्त) इतका निधी **संबंधित विभाग प्रमुख / प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांचे आस्थापनेवरील संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांना मोटार वाहन अग्रिम वाटप करण्याकरिता बी.डी.एस. प्रणालीवर सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.**

२. सदर शासन निर्णयानुसार शासनाने चिन्हांकित करुन दिलेल्या रु.२०,००,०००/-(अक्षरी वीस लाख फक्त) एवढ्या निधीचे संबंधित कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांना, शासन निर्णय वित्त विभाग, क्र. अग्रिम-२०१३/ प्र.क्र.१०/२०१३ विनियम दि.२०/०८/२०१४ अन्वये मूळ वेतनाच्या ९ पट एवढी रक्कम किंवा अनुक्रमे रु.७०,०००/- (मोटार सायकल करिता) / रु.६०,०००/- (स्कूटर करिता) किंवा मोटार सायकल/स्कूटरची किंमत या पैकी कमीत कमी रकमचे मोटार सायकल/स्कूटर अग्रिमाकरिता वाटप करावे.

३. सोबतच्या विवरणपत्रातील रकाना क्र.३ मध्ये नमुद विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे त्यांच्या अधिपत्याखालील संबंधित अधिकारी /कर्मचाऱ्यांना शासन निर्णय वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनियम, दिनांक १७/०४/२०१५ अन्वये मुंबई वित्तिय नियम १९५९ मधील तरतुदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या वित्तिय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उप विभाग-एक, मधील अनुक्रमांक १२ नियम १३६,१३७ व १३९ अन्वये मोटार वाहन अग्रिम मंजूरीचे आदेश निर्गमित करावेत.

४. **विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना सूचित करण्यात येते की, म.शा.वि.वि. क्र. अग्रिम-२०१३/प्र.क्र.१०/ २०१३/ विनियम, दि.२०/०८/२०१४ आणि शासन निर्णय वित्त विभाग क्र.अग्रिम २०११ /प्र.क्र.५७ /२०११ / विनिमय दि.१७/०२/२०१२ अन्वये विहित केलेल्या अटी व शर्तीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सदर दि.२०/०२/२०१४ च्या शासन निर्णयातील अट क्र. २ (९) नुसार मोटार सायकल/ स्कूटरसाठी आणि शासन निर्णय क्र.अग्रिम २०११/प्र.क्र.५७/२०११/विनियम, दि.१७/०२/२०१२ नुसार मोटार कारसाठी अग्रिमाचा मंजुरी आदेश निर्गमित करताना त्यामध्ये सदर शासन निर्णयातील खालील अटी शर्तीचा उल्लेख करावा :-**

१) शासन निर्णयातील विहीत तरतुदीनुसार मोटार वाहन खरेदीबाबत आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे मोटार वाहन अग्रिम प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत संबंधीत कर्मचाऱ्यांनी सादर करावीत. तसे न केल्यास अग्रिम धारकाकडून अग्रिमाची संपुर्ण रक्कम १ महिन्यानंतर दंडनीय व्याजासह एक रकमी वसूल करण्यात येईल.

२) मोटार वाहनाच्या मॉडेलचे नाव, उत्पादनाचे वर्ष, खरेदीची तारीख व त्या संदर्भाचे नोंदणीचे कागदपत्र सादर करावी लागतील.

३) मोटार कार, मोटार सायकल, स्कूटर, मोपेड, सायकल व अपंग राज्य शासकीय कर्मचा-यांसाठी स्वयंचलीत तीन चाकी सायकल, स्कूटर विथ ॲडप्शन व मोपेड यांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविण्यात यावा व तो सतत चालू राहील याची दक्षता घेणे आवश्यक राहील.

४) वाहन अग्रिम रकमेच्या नियमित वसुलीसाठी तसेच मंजूर अग्रिम रकमेपेक्षा कमी किंवा जादा वसुली होत असल्यास त्यास अर्जदार स्वतःही जबाबदार राहील.

५) अग्रिमधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासुन दूर राहिला तरीही वाहन अग्रिम तसेच शासनाकडील इतर अन्य अग्रिमांची नियमित परतफेड करण्यास संबंधित अग्रिमधारक स्वतः जबाबदार राहील.

५. अग्रिम मंजूर करताना मुंबई वित्तीय नियम-१९५९ मधील नियम १२४(बी) व वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अग्रिम-१०९५/ प्र.क्र.७०/ ९५/ विनियम, दि. २६/०९/१९९७ मध्ये नमूद तसेच, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार लागू ठरणाऱ्या दंडनीय व्याजाचा उल्लेख मंजूरीच्या आदेशात करण्यात यावा.

६. शासनाने, सदर शासन निर्णयान्वये चिन्हांकित करुन दिलेल्या निधीचा विनियोग दि. ३१/०३/२०२४ पर्यंत होणे आवश्यक आहे. सर्व घटक प्रमुखांना निर्देशित करण्यात येते की, देयके दि.३१/१२/२०२३ पूर्वी कोषागारात सादर करुन ती पारीत करुन घ्यावीत. तसेच अग्रिमाची रक्कम ज्या महिन्यात वितरीत केली असेल त्याच्या पुढील महिन्यापासून

अग्रिमाच्या वसूलीस सुरुवात करावी.

७. सदर निधीचा विनियोग पुर्णत: न केल्यास किंवा तो व्यपगत झाल्यास त्याची सविस्तर कारणे शासनास व लोकलेखा समितीस सादर करावी लागतात. तरी निर्देश देण्यात येत आहेत की, विभाग प्रमुख यांनी त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांचे मोटार वाहन अग्रिम मंजूरी संबंधीचे आदेश त्वरीत निर्गमित करावेत. आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित कोषागार कार्यालयास त्यासंबंधीची देयके सादर करुन सदरची देयके कोणत्याही परिस्थितीत दि.३१/१२/२०२३ पूर्वी पारित करुन घ्यावीत. तसेच संबंधीत अधिकारी / कर्मचाऱ्याला अग्रिम रक्कम अदा करणे ही सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधित घटक प्रमुखांची असल्यामुळे त्यांनी सदर प्रकरणांची तातडी व गांभीर्य लक्षात घेऊन व या प्रकरणी वैयक्तीकरित्या लक्ष देऊन त्यांचे कार्यालयातील लेखा विषयक कामकाज हाताळणारे लेखा अधिकारी/ सहाय्यक लेखा अधिकारी /लिपिक वर्गीय अधिकारी /कर्मचारी यांनी स्वत: लक्ष देऊन त्याप्रमाणे विहीत कालावधीत अचूक व परिपूर्ण कामे करण्याबाबत सक्त सूचना द्याव्यात. संबंधीतांना अग्रिम रक्कम अदा केल्यानंतर त्याची दिनांकित अदारोल पावती, देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक त्यांचे सेवापुस्तकात/ सेवापटात नोंद करावा आणि या कार्यालयास /शासनास व महालेखापाल-१,मुंबई /महालेखापाल-२, नागपूर/अधिदान व लेखा कार्यालय मुंबई यांना **दि.३१/१२/२०२३** पूर्वी न चुकता तसा अहवाल सादर करावा.

८. असे निर्देश देण्यात येत आहेत की, उपलब्ध करुन दिलेल्या वरील रकमेच्या खर्चाचा ताळमेळ महालेखापाल यांचे कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी/ महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण-१४ नियम १५७ च्या परिशिष्ट ३ तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करुन त्याबाबतची प्रमाणित माहिती शासनास विहित मुदतीत पाठविण्यात यावी व त्यानुसार या कार्यालयाने मंजूर केलेल्या अग्रिमाच्या खर्च मेळयाची प्रमाणित माहिती दि.३१/०३/२०२४ पूर्वी महालेखापाल यांचे कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.

९. असेही निर्देश देण्यात येत आहेत की, खर्चमेळयाची माहिती महालेखापाल यांच्या कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपूर्ण जबाबदारीही क्षेत्रीय विभागीय कार्यालय प्रमुखांची राहील व त्याप्रमाणे माहिती न पाठविणाऱ्या कार्यालयातील संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करणे भाग पडेल याची कृपया नोंद घ्यावी. प्रमाणित न केलेली माहिती स्वीकारण्यात येणार नाही. या कारणामुळे विलंब झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग/कार्यालय प्रमुखांची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.

१०. सदरचा खर्च सन २०२३-२४ या वित्तीय वर्षातील गृह विभाग मागणी क्र.बी - ११ मुख्यलेखाशिर्ष " ७६१०-शासकीय कर्मचारी इ.कर्जे " मधील गौणशिर्ष २०२ - मोटार वाहन अग्रिम (सांकेतांक क्रमांक ७६१०००९६) अन्वये खर्ची टाकण्यात यावा व वित्तीय वर्ष २०२३-२४ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सदरचा खर्च याच लेखाशिर्षाखाली नोंदविला गेला आहे, याची खातरजमा करण्याची कृपया नोंद घ्यावी.

(निसार तांबोली )
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक कार्यालय, म. राज्य, मुंबई

प्रति,

पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
पोलीस अधीक्षक, हिंगोली / नांदेड / जळगांव / औरंगाबाद ग्रामीण
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १० सोलापूर/ १४ औरंगाबाद

प्रत सविनय सादर -

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, नवीन प्रशासकीय इमारत,
मादामकामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२
**(लक्षवेध:- कक्ष अधिकारी, आस्था - १)**
महालेखापाल - १ मुंबई / महालेखाकार - २, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

| पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई "७६१०-शासकीय कर्मचारी इ. ना कर्जे " वित्तीय वर्ष २०२३-२४ मागणी क्र.बी-११ गौणशिर्ष २०२- मोटार वाहन अग्रिम | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | घटक कार्यालयाचे नाव | विभाग प्रमुख | अर्जांची संख्या | मागणी केलेले अनुदान |
| १ | पोलीस अधीक्षक, हिंगोली | पोलीस अधीक्षक, हिंगोली | ३ | २,१०,००० |
| २ | समादेशक, रारापोबल गट क्र.१४ औरंगाबाद | समादेशक, रारापोबल गट क्र.१४ औरंगाबाद | ७+१ | ५,५०,००० |
| ३ | पोलीस अधीक्षक, नांदेड | पोलीस अधीक्षक, नांदेड | १ | ७०००० |
| ४ | समादेशक, रारापोबल गट क्र.१० सोलापूर | समादेशक, रारापोबल गट क्र.१० सोलापूर | ८ | ५६०००० |
| ५ | पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड | पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड | २ | १२०००० |
| ६ | पोलीस अधीक्षक, जळगांव | पोलीस अधीक्षक, जळगांव | ५ | ३५०००० |
| ७ | पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण | पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण | २ | १४०००० |
| | | **एकूण** | २९ | **२०,००,०००/-** |